## सराईत मोबाईल चोराकडून ११ मोबाईल हँण्डसेटस जप्त, ६ गुन्हे उघडकीस

मा.वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणे, मोबाईल हँण्डसेट चोरीचे गुन्हेगारांना पकडण्यासाठी प्रयत्न करीत असताना,

गुन्हे शाखा, युनिट ३, पोलीस हवालदार अनिल घाडगे यांना मिळालेल्या बातमीवरून आरोपीत नामे १. सुनिल अनंता गायके वय २९ वर्षे सध्या राहणार गाळा नं ५६७, भाजीमार्केट, मार्केटयार्ड पुणे मुळ रा. मेंगाई मंदीरा शेजारी, वेल्हा ता. वेल्हा, जि. पुणे २. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली प्रकाश वाडघरे वय २७ वर्षे रा. अमृता रेसीडेन्सी, फ्लॅट नं ४०४, ४ था मजला, पुनम पेट्रोलपंपामागे, मांगडवाडी, पुणे मुळ रा. मेगजाईवाडी, पो. वांगणी, ता. वेल्हा, जि. पुणे यांना दिनांक ११/०६/२०१८ रोजी सी.आर.पी.सी ४१(१)(ड) प्रमाणे अटक केली.

अटक आरोपी हे आंबेडकरनगर जवळ, मार्केटयार्ड, पुणे येथे चोरीचे मोबाईल विक्री करीता आले असताना त्यांना ताब्यात घेतले. तेंव्हा त्याचे कब्जातुन ११ चोरीचे मोबाईल हँण्डसेटस मिळाले. नमुद आरोपीताकडे अधिक तपास करता, त्यांनी ते सर्व मोबाईल हँण्डसेटस भाजी व फळ बाजार, मार्केटयार्ड येथील गाळ्यांमधून रात्रीचे वेळेस कामगार लोकांनी चार्जींगला लावले असताना, वेळोवेळी मोबाईल हँण्डसेटस चोरी केले असल्याचे सांगीतले.

आरोपीत सुनिल अनंता गायके याचे विरूध्द वारजे पोलीस स्टेशन येथे २ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.

नमुद आरोपीतांकडून आज रोजी पर्यंत किं.रू १,१९,०००/- चे ११ मोबाईल हॅन्डसेट हे जप्त करण्यात आलेले आहेत. त्यातील ६ मोबाईल हँण्डसेटस बाबत मार्केटयार्ड पोलीस ठाणेस गुन्हे दाखल आहेत. उर्वरीत ५ मोबाईल हॅन्डसेटच्या मालकांचा शोध सुरू आहे. वर नमुद ठिकाणाहून कोणाचे मोबाईल हॅन्डसेट हे चोरी गेले असल्यास युनिट-३ कार्यालयाशी संपर्क साधावा..

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. समीर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सतीष शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहा.पो.उप.निरीक्षक अशोक भोसले, अनिल घाडगे, अतुल साठे, आजिनाथ काळे, रोहिदास लवांडे, महेंद्र पवार, गजानन गाणबोटे, गुणशिलन रंगम, अनिल भोसले, शिवानंद स्वामी, संदीप राठोड, संदीप तळेकर, कल्पेश बनसोडे, चालक पोशि सुजित पवार यांनी केली आहे.

आव्हान मार्केटयार्ड पो-किवा कार्यालयांचे ३ यांच्याशी संपर्क साधावा


गुन्हे शाखा, युनिट ३ पुणे


गुन्हे शाखा, युनिट ३ पुणे